MHAU120007802024

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.–११७/२०२४**
**केसरबाई पाटील वि. कोणीही नाही**

## निशाणी क्र.१ खालील आदेश

०१. अर्जदार हिने सदरहु अर्ज हा मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ खाली दाखल केला आहे.

०२. अर्जदाराच्या अर्जात असे आले आहे की, तिची आई मयत **रेणुबाई रतिराम पाटील** यांचा मृत्यु दि.२२.०५.१९८५ रोजी मौजे सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे झाला आहे तसेच तिचा भाऊ मयत **लिलाधर रतिराम पाटील** यांचा मृत्यू दि.०७.१२.१९९३ रोजी सोयगाव येथे मृत्यू झालेला आहे. मयत लिलाधर यांचा विवाह झालेला नसल्याने, त्यांचा सांभाळ अर्जदार यांनी केला आहे. तसेच अर्जदाराच्या अर्जात पुढे असे आले आहे की, तो मयत **रेणुबाई रतिराम पाटील** व **लिलाधर रतिराम पाटील** यांचे वारस आहे. सबब, अर्जदाराने सदरचे प्रकरण हे मयतांचे वारस आहे, असे घोषित होवुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

०३. अर्जदार याने त्याच्या स्वतः च्या शपथेवर पुरावा प्रतिज्ञालेख **नि.क्र–९** वर दाखल केला. तसेच अर्जदाराने मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र **नि.क्र.–१० व ११** वर दाखल केले. अर्जदाराने त्याचे वडील रतिराम पाटील हे मयत असल्याबाबत पुरसीस नि.क्र.१५ वर दाखल केली. त्यानंतर अर्जदाराने **नि.क्र.–१४** खाली पुरावा बंद पुरसीस दाखल केली.

०४. अर्जदार यांचे विधीज्ञ श्री. प्रसन्न फासे यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार ही मयत **रेणुबाई रतिराम पाटील** व **लिलाधर रतिराम पाटील** यांचे वारस आहे, तसेच अर्जदारास शासकीय योजनांचा लाभ घेणेसाठी, इतर अनुषांगिक कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी, अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी विनंती केली.

०५. विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अर्जाची व दाखल दस्तऐवजांची पाहणी केली. अर्ज दाखल केल्यानंतर सन १८२७ चा मुंबई विनियम ८ च्या नियम २ व ३ प्रमाणे न्यायालयाने अर्जदारांचे अर्ज मिळाल्यानंतर परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेल्या नमुन्या नुसार घोषणापत्र काढले. त्यावरुन औरंगाबाद व जळगाव आवृत्तीच्या दि.१३.११.२०२४ व १४.०१.२०२६ रोजीच्या **"तरुण**

**भारत"** पेपर मध्ये जाहीर नोटीस प्रकाशीत केली, ती **नि.क्र.–१२ व १३** नुसार अभिलेखात दाखल आहे. तसेच जाहीरनामा हा नगरपंचायत कार्यालय सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे तसेच दिवाणी न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला त्याचा अहवाल **नि.क्र.–७** नुसार अभिलेखात दाखल आहे.

०६. अर्जदारांच्या हक्कास आक्षेप घेणाऱ्या सर्व इसमांनी घोषणापत्राच्या तारखेपासुन एका महिन्याच्या आत न्यायालयास निवेदन करुन, आपल्या हरकती नोंदवाव्या अशी उक्त घोषणा पत्राव्दारे त्यांना विनंती करण्यात आली होती. परंतु त्यावरुन पुरेशी होईल, अशी कोणाचीही हरकत घेण्यात आली नाही. अर्जदारांनी दाखल केलेला पुरावा हा, हा उलटतपास न झाल्यामुळे अबाधित राहिला. अर्जदाराने दाखल केलेले दस्तऐवज व अर्जदारांचा अबाधित पुरावा, यावरुन असे लक्षात येते की, **रेणुबाई रतिराम पाटील** हया **दि.२२.०५.१९८५ व लिलाधर रतिराम पाटील हे दि.०७.१२.१९९३** रोजी मयत झालेले आहेत व अर्जदार ही त्यांची वारस असल्याचे दिसुन येते. एकंदरीत सर्व बाजुचा विचार करुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मुंबई नियमन १८२७ च्या विनीयम ८ नियम २ व ३ प्रमाणे अर्जदार केसरबाई अशोक पाटील हिस मयत **रेणुबाई रतिराम पाटील** व **लिलाधर रतिराम पाटील** यांचे मान्यता दिलेले वारस असल्याबाबतचे परिशिष्ट 'ब' मधील नियमानुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरच्या प्रमाणपत्राव्दारे मयताच्या मिळकतीवर अर्जदारास कुठल्याही प्रकारचा अधिकार प्रस्थापित होणार नाही.

४. अर्जदार यांनी विहीत न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर त्यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

५. याव्दारे प्रकरण बंद करण्यात आले.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.03.25 11:54:19 +0530

**दिनांक – २४.०३.२०२६**

[एम. बी. पाटील]
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सोयगांव